● सलीम-जावेद या लेखक जोडगोळीतील सलीम खान *बारात* या चित्रपटात सर्वप्रथम नट म्हणून चमकले होते. ● जुन्या चित्रपटाचा रिमेक असलेल्या *माँ-बाप*ने भारताबाहेर नैरोबीला रौप्यमहोत्सव साजरा केला. ● *चांद मेरे आजा* चालला नसला तरी चित्रगुप्त यांचं संगीत अविस्मरणीय ठरलं. ● सहनायिका म्हणून चमकलेली कुमकुम *नाचे नागीन बाजे बीन*मध्ये नायिका बनली.

□ इसाक मुजावर


***बारात* (१९६०)**

१९५९ मध्ये चित्रगुप्तनी नऊ चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन केले होते. १९६० मध्ये त्यांच्या चित्रपटांची ही संख्या एकाने खाली आली. *बारात, चांद मेरे आजा, गॅम्बलर, माँ-बाप, नाचे नागीन बाजे बीन, पोलीस डिटेक्टिव्ह, पतंग, जिम्बो कम्स टू टाऊन* या आठ चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन त्यांनी १९६०मध्ये केले. यापैकी *जिम्बो कम्स टू टाऊन* हा चित्रपट म्हणजे १९५८च्या *जिम्बो* या चित्रपटाचा दुसरा भाग होता. *जिम्बो* चित्रगुप्तनी संगीतबद्ध केला होता आणि *जिम्बो कम्स टू टाऊन*लादेखील त्यांनीच संगीत दिलं.

१९६०च्या चित्रगुप्त यांच्या आठ चित्रपटांपैकी *बारात*चे निर्माते दिग्दर्शक होते के. अमरनाथ. १९४५ साली त्यांनी रमणिक प्रॉडक्शनसाठी *गांव की गोरी* तथा *व्हिलेज गर्ल* हा नूरजहाँ व नजीर यांची भूमिका असलेला चित्रपट दिग्दर्शित केला होता. साठचा त्यांचा *बारात* म्हणजे १९४५च्या त्यांच्या *गांव की गोरी* या चित्रपटाचाच रिमेक होता. *गांव की गोरी*चं एक ऐतिहासिक महत्त्व आहे. *गुलबलोच* या पंजाबी चित्रपटात श्यामसुंदर यांच्या संगीतात एक पंजाबी गाणं गाऊन चित्रपटातील आपल्या संगीत जीवनाची सुरुवात करणाऱ्या महंमद रफीने हिंदी चित्रपटातील आपले पहिले गाणे *गांव की गोरी*मध्ये श्यामसुंदर यांच्या संगीतात गायले होते. या गाण्याचे बोल होते. 'अजी दिल हो काबू में तो दिलदार की ऐसी तैसी...' हे गाणे रफीने जी. एम. दुर्रानीबरोबर गायले होते. रफी तेव्हा कोणीच नव्हता. पण साठच्या *बारात*पर्यंत तो चित्रपटातला एक आघाडीचा पार्श्वगायक बनला होता. आणि *बारात*मधील आठ गाण्यांपैकी पाच गाण्यांत त्याचा आवाज ऐकू आला होता. या पाच गाण्यांपैकी 'ओ बाबू तेल मालिश करा लो बूट पालिश...' व 'ओ जानेवाले हमारे गली आना...' ही दोन गाणी त्याने मन्ना डेबरोबर गायली होती. आणि ती या चित्रपटाचा नायक अजित व हास्यअभिनेता मुकरी यांच्यावर चित्रित करण्यात आली होती. 'अजी अब कहा मान जाओ तुम बडे मैं छोटी...' हे या चित्रपटात एक गाणे रफीने गीता दत्तबरोबर गायले होते आणि ते अजित व या चित्रपटाची नायिका शकिला यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. 'जालीम कहना मान, लचकती चल न खा कर पान...', 'मोहन मैं एक भटका राही तुम पथ के उजिया रे हो...' ही या चित्रपटातील दोन गाणी रफीने कोरसबरोबर गायली होती. मुकेशच्या वाट्याला



मोहम्मद रफी



सलीम खान

या चित्रपटातील 'मुफ्त हुए बदनाम किसी से हाय दिल को लगा के...' हे एकच गाणे आले होते. आणि या चित्रपटातील या गाण्यालाच सर्वाधिक लोकप्रियता मिळाली होती.

*गांव की गोरी*त नूरजहाँ गायिका असल्यामुळे तिच्या गाण्यालाच जास्तीत जास्त वाव देण्यात आला होता. पण *बारात*मध्ये गायिकेहून गायकाच्या आवाजातील गाण्यालाच जास्तीत जास्त वाव देण्यात आला होता. आठ गाण्यांपैकी तीन गाण्यातच या चित्रपटात गायिकेचा आवाज ऐकू आला होता. या तीन गाण्यांपैकी एक गाणे गीता दत्तने रफीबरोबर गायले होते. दोन गाणी लताबाईंच्या आवाजात होती. 'पकडी गई, पकडी गई, लो गोरी की चोरी पकडी गई...' हे या चित्रपटातील एक गाणे लताबाईंनी कोरसबरोबर गायले होते. तर 'आजा रे तेरा एक सहारा कोई यह न कहे मेरा कोई नही...' हे गाणे एकटीने.

मजरूह सुलतानपुरींनी या चित्रपटातील एकजात सारी गाणी लिहिली होती. सलीम-जावेद या लेखकद्वयीपैकी सलीम सुरुवातीला नट बनण्यासाठी चित्रपटात आले होते हे तुम्हाला माहीत आहेच *बारात*नेच त्यांना नट म्हणून सर्वात प्रथम चित्रपटात आणले. हे हैद्राबादचे आणि *बारात*चा नायक अजीतदेखील हैद्राबादचाच. त्याच्या ओळखीमुळेच *बारात*मधील भूमिकेत सलीम यांची वर्णी लागली होती.

***माँ-बाप* (१९६०)**

चित्रगुप्तनी संगीत दिलेला १९६०चा *बारात* हा चित्रपट १९४५च्या *गांव की गोरी* या जुन्या चित्रपटाचा रिमेक होता तर *माँ-बाप* हा चित्रपट १९४४च्या याच नावच्या जुन्या चित्रपटाचा रिमेक होता. *बारात, गांव की गोरी*चे दिग्दर्शक के. अमरनाथ यांनी दिग्दर्शित केला होता. तर *माँ-बाप* १९४४च्या *माँ-बाप*चे दिग्दर्शक व्ही. एम. व्यास यांनी दिग्दर्शित केला होता. *गांव की गोरी*च्या तुलनेत *बारात* फारसा चालला नव्हता. पण *माँ-बाप* मात्र १९४४च्या *माँ-बाप* इतकाच चालला होता आणि भारताबाहेर नैरोबीला रौप्यमहोत्सव साजरा करून या चित्रपटाने यशाचा एक उच्चांक गाठला होता.

१९४४च्या *माँ-बाप*चे संगीतकार होते तबलानवाझ अल्लारखाँ. या चित्रपटाचे संगीत नियोजन करीत असताना त्यांनी या चित्रपटातील 'मधुर सुरो में गोब चांदनी...' हे गाणेदेखील राजकुमारीबरोबर गायले होते. गायकाचा आवाज या एकाच गाण्यात या चित्रपटात ऐकू आला होता. कारण हा चित्रपट गायिकेच्या गाण्यांना प्राधान्य देणारा एक चित्रपट होता. आणि गायिकेच्या आवाजाला प्राधान्य देताना राजकुमारी, जोहरा जान, कल्याणी, ललिता परुळेकर, अमीरबाई कर्नाटकी या पाच गायिकांचा आवाज अल्लारखाँनी या चित्रपटाच्या संगीतात घेतला होता. पण साठच्या दशकात लताबाईंच्या आवाजाचा वरचष्मा आपल्या चित्रपट संगीतात वाढत चालला होता. याचाच परिणाम असेल गीता दत्त व उषा मंगेशकर

यांनी गायलेल्या 'यह दुनिया एक मेला है, यहाँ इन्सान मिलते है...' या एका गाण्याचा अपवाद वगळता या चित्रपटातील गायिकेच्या आवाजातील अन्य गाण्यात फक्त लताबाईंचाच आवाज होता. त्यांच्या आवाजातील चार गाणी या चित्रपटात होती. या चार गाण्यांपैकी 'जले जो पराई आग में दिवाना कह गया...' व 'एक तस्वीर लागे उनकी सुरतिया कुछ ऐसी भली जैसी कौवे की चोच में अनारकली...' ही दोन गाणी त्यांच्या एकटीच्या आवाजात होती. आणि 'यह पहली घटा सावन की...' व 'जो दिल को छोड के सूरत पे मरे...' ही दोन गाणी त्यांनी कोरसबरोबर गायली होती. रफीने या चित्रपटातील तीन गाणी गायली होती. या तीन गाण्यांपैकी 'ले लो ले लो दुआएँ माँ-बाप की सिर से उतरेगी गठरी पाप की...' हे गाणे या चित्रपटाचे शीर्षक गीत होते आणि पार्श्वगीत म्हणून या गाण्याचा या चित्रपटाचा उपयोग करण्यात आला होता. 'जिस दिन इस दुनिया से नफरत और खुदगर्जी मिट जायेगी, उस रोज से इन्साँ नाचेगा...' हे गाणे रफीने एकट्याने गायले होते आणि एक साथी मेरा बडा पुराना...' हे गाणे कोरसबरोबर. ही दोन्ही गाणी या चित्रपटाचा नायक राजेंद्रकुमार यांच्यावर चित्रित करण्यात आली होती.

राजेंद्रकृष्णनी या चित्रपटाची सारी गाणी लिहिली होती.

चाँद मेरे आजा(१९६०)

*बारात, माँ बाप*बरोबरच चित्रगुप्त यांच्या संगीतासाठी लक्षात असलेला १९६०चा आणखी एक चित्रपट म्हणजे राम दर्यानी यांचा *चाँद मेरे आजा* या चित्रपटाच्या नावातील *चाँद* या चित्रपटातील दोन गाण्यांत होता. या दोन गाण्यांपैकी 'राहो में तेरी नयना बिछाए चाँद मेरे आजा....' हे गाणे या चित्रपटाचे शीर्षक गीत होते. ते लताबाईंनी गायले होते आणि या चित्रपटाची नायिका नंदा हिच्यावर चित्रित करण्यात आले होते. दुसरे गाणे एक द्वंद्वगीत होते. या द्वंद्वगीताचे बोल होते 'चाँद को देखो जी मस्ती लुटाए जादू जगाए...' लता, रफी यांनी हे द्वंद्वगीत गायले होते. आणि ते या चित्रपटाचा नायक भारत भूषण व नंदा यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. त्या दोघांच्यावर चित्रित करण्यात आलेला 'ओ ओ तेरी आँखो में प्यार मैंने देख लिया...' हे आणखी एक द्वंद्वगीत रफी व लता यांनीच गायले होते.

*बैजू बावरा*च्या यशापासून भारत भूषणच्या तोंडी दुनियादारीचं एखादे गाणे असलेच पाहिजे ही गोष्ट अगदी ठरून गेल्यासारखी झाली होती. *चाँद मेरे आजा*देखील याला अपवाद नव्हते. या चित्रपटातही 'ओ पैसेवालो कैसा तुम्हारा ये संसार है, झूठे की जीत यहाँ सच्चे की हार है...' हे दुनियादारीचे महात्म्य सांगणारे एक गाणे रफीच्या आवाजात होते. आणि ते भारत भूषणवरच चित्रित करण्यात आले होते. या धीरगंभीर गाण्याबरोबरच रफीने या चित्रपटातील 'हाय रे जरा देखो ओ गोरी मुडके हम भी तो खडे है रास्ते में...' हे एक हास्यगीत देखील गायले होते. आणि ते मारूती या हास्य अभिनेत्यावर चित्रित करण्यात आले होते. *चाँद मेरे आजा* हे शीर्षक गीत गात असताना लताबाईंनी या चित्रपटातील 'सजना, सजना काहे भूल गए दिन प्यार के...' व 'फूलो पे



चित्रगुप्त



कुमकुम

निखार है, बहारों पे बहार है...' ही आणखी दोन गाणी एकटीने गायली होती.

चित्रगुप्त यांचे संगीत असलेला चित्रपट 'चालो अगर न चालो...' त्या चित्रपटातील त्यांच्या संगीतात अनेकदा एक असा गोडवा असायचा की चित्रपट पडल्यावरदेखील तो गोडवा आपल्या कानात गुंजारव करीत राहायचा. *चाँद मेरे आजा*च्या संगीतात हा गोडवा होता. यामुळे या चित्रपट विसरला गेला असला तरी या चित्रपटातील चित्रगुप्त यांचे संगीत काही विसरले गेलेले नाही.

प्रेमधवन व ईश्वरचंद्र कपूर यांनी या चित्रपटाची गाणी लिहिली होती.

नाचे नागीन बाजे बीन(१९६०)

काली टोपी लाल रूमाल या चित्रपटात शकिला नायिका असली तरी या चित्रपटाची सहनायिका कुमकुमच या चित्रपटात तिच्याहून अधिक भाव खाऊन गेली. याचाच परिणाम असेल, *काली टोपी लाल रूमाल*चे निर्माते देवी शर्मा यांनी त्यानंतरच्या आपल्या *नाचे नागीन बाजे बीन* या चित्रपटात तिला नायिका म्हणून एकदम बढती दिली. *काली टोपी लाल रूमाल*चा नायक चंद्रशेखरच या चित्रपटात तिचा नायक होता आणि *काली टोपी लाल रूमाल*चे संगीतकार चित्रगुप्तच या चित्रपटाचे संगीतकार होते.

नागीन या चित्रपटाच्या यशानंतर आपल्या अनेक चित्रपटात सापांची वळवळ सुरू झाली होती. आणि बीनच्या संगीताचा सूर छेडला जाऊ लागला होता. या चित्रपटाच्या नावातच नागीन असल्यामुळे या चित्रपटातही सापांची वळवळ होती आणि गाण्यात *नागीन* हा शब्द. या चित्रपटातील दोन गाण्यात *नागीन* हा शब्द आला होता. रफी व लता यांनी कोरसबरोबर गायलेल्या 'मैं हूं गोरी नागीन देखूंगी रसिआ कैसे आज बाजे तेरी बीन...' या एका गाण्यात आणि त्याच्याबरोबर रफी व सुमन कल्याणपूर यांनी गायलेल्या 'गोरी नागीन बनके मत चला करो, जादू मारेगा सपेरा कोई...' या आणखी एका गाण्यात. या गाण्यांपैकी रफी व लता यांचे गाणे चंद्रशेखर व कुमकुम यांच्यावर चित्रित करण्यात आले होते व रफी-सुमन यांचे गाणे चंद्रशेखर आगा व कुमकुम यांच्यावर 'चले हो कहाँ सरकार हमे बेकरार कर के...' व 'बित गई आधी रात चांदनियाँ धीरे धीरे आना...' ही या चित्रपटातील आणखी दोन गाणी रफी व लता यांच्या आवाजात होती. आणि तीदेखील चंद्रशेखर व कुमकुम यांच्यावरच चित्रित करण्यात आली होती. लताबाईंच्या-बरोबर तीन व सुमन कल्याणपूरबरोबर एक गाणे गात असताना रफीने या चित्रपटात एक गाणे गीतादत्तबरोबर गायले होते. या गाण्याचे बोल होते 'खडी रे खडी रे कब से देख राजा रानी हाय तेरे मिलने को मैं खडी रे...' आगा व हेलन यांच्यावर हे गाणे चित्रित करण्यात आले होते.

'लेके सहारा तेरे प्यार का, देख रे रस्ता तेरे हाय बेकरार...'हे या चित्रपटातील एक गाणे रफीच्या एकट्याच्या आवाजात होते. आणि तेदेखील चंद्रशेखरवरच चित्रित करण्यात आले होते. 'हम जान लुटा देंगे अपनी, साजन की जान से पहले...' हे या चित्रपटातील एक गाणे लताबाईंच्या आवाजात होते. आणि ते कुमकुमवर चित्रित करण्यात आले होते. *काली टोपी लाल रूमाल*प्रमाणेच या चित्रपटातील चित्रगुप्त यांच्या संगीतातील एकजात सारी गाणी मजरूह सुलतान पुरींनी लिहिली होती. ●